# समकालीन मानवी हक्क




संपादक

डॉ. प्रतिभा टावरी

डॉ. संदिप काळे

# समकालीन मानवी हक्क


■ डॉ. प्रतिभा अशोक टावरी
डॉ. संदीप बी. काळे



■ प्रथम आवृत्ती – १० डिसेंबर २०२२



© प्रकाशक व संपादक



■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 200/-

ISBN-978-93-91305-84-0



सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

| | | |
|---|---|---|
| 14 | भारतातील महिलांचे हक्क आणि हिंसाचार : घटनात्मक सुरक्षेचा अभ्यास डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर | 79 |
| 15 | भारतातील अनुसूचित जातींच्या मानवी हक्कांचे वास्तव प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे | 94 |
| 16 | मानवी हक्क आणि मतदान अधिकार प्रा. भोये सुरेश मुरलीधर | 100 |
| 17 | मानवाधिकार आणि बालकाच्या समस्या डॉ. प्रविण भास्करराव हाडे | 106 |
| 18 | बालकांचे मानवी हक्क प्रा. डॉ. प्रिया भानूदास बोचे | 112 |
| 19 | मानवाधिकार आणि वैश्विक घोषणापत्र डॉ.दिपक निवृत्ती कारे | 116 |
| 20 | महिला सशक्तिकरण एवं भारतीय संविधान डॉ. संगीता भांगड़िया मालाणी | 123 |
| 21 | मानवाधिकाराच्या परिप्रेक्षात बाल विकास: एक अवलोकन निहार अशोक बोदेले | 132 |
| 22 | मानवी हक्क संकल्पना अर्थ् आणि स्वरुप प्रा. डॉ.संध्या गो. चर्जन | 139 |
| 23 | आरोग्य आणि मानवाधिकार प्रा. डॉ. भगवान श्रीपती सांगळे | 147 |
| 24 | महिलांचा मानवी अधिकार :- एक दृष्टीक्षेप प्रा.डॉ.सतिष.एम.कटके | 155 |
| 25 | आदिवासी महिला सक्षमीकरणातील मानवाधिकार हे समाजकार्यापुढील एक आव्हान...!!! श्री. संतोष सूर्यवंशी ,प्राचार्य डॉ.विलास देशमुख | 163 |

# बालकांचे मानवी हक्क

प्रा. डॉ. प्रिया भानूदास बोचे
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा.

बालक हे श्रमाचे स्वस्त स्त्रोत असतात. दारिद्यामूळे बरीच बालके यामध्ये ओढली जातात. १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या कामगारास बाल कामगार म्हणतात. बालकामगाराचा अर्थ विविध अधिनियम व कायद्यामध्ये वय वर्ष १४ किंवा १८ पेक्षा कमी वयाच्या व्यक्ती म्हणजे बालकामगार असा आहे. दर वर्षी १२ जून हा बालकामगार विरोधी जागतिक दिन म्हणून साजरा केला जातो. संयूक्त राष्ट्र बाल हक्क करारानूसार बालक म्हणजे १८ वर्षापोक्षा कमी वयाची व्यक्ती, परंतू संयुक्त राष्ट्राच्या या कराराने विविध देशांना आपआपल्या गरजेनूसार वेगवेगळया कायद्यासाठी बालकाचे वेगवेगळे गट निश्चित करण्याची मुभा दिली आहे.यानूसार भारतीय घटनेत कलम २१ ए मध्ये शिक्षणाच्या मूलभूत हक्का संबंधी ६ ते १४ वयोगटातील वयाच्या व्यक्तिंना बालक म्हटले आहे. तर कलम २४ मध्ये बालकामगाराच्या व्याख्येसाठी १४ पेक्षा कमी वयोगटातील व्यक्तींना बाल कामगार असे संबोधिले गेले तर भारताच्या जनगणने नुसार ही बालक १४ वर्षापर्यंत संबोधिले जाते. तर खाण कायदा, बालविवाह प्रतिबंध कायद्यानूसार १८ पेक्षा कमी वयाच्या व्यक्तिंना बाल समजले जाते. भारताच्या नवीन राष्ट्रीय यूवा धोरणानूसार वय वर्ष १५ ते २९ वयामधील व्यक्तिला यूवा, असे समजले जाते त्यामुळे वय वर्ष १४ पेक्षा कमी असणा-या व्यक्तिंना बाल संबोधिले जाते.

जन्मापासून ते किशोरवयीन अवस्थेच्या समाप्ती पर्यत मानवामध्ये घडून येणा-या शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदलांचा संबंध बालविकासाशी आहे. शिक्षणाशिवाय व्यक्तिला आपला विकास साधता येणे शक्य नाही. म्हणून बालवयापासून शिक्षणाच्या सोयीसूविधा पुरविणे त्याची अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे. स्त्रीभूणहत्त्या, बालकामगार, बालविवाह इ. समाजामध्ये घडतांना दिसते ह्या समस्यांवर मात करण्यासाठी बालकांची जात, वर्ण, लिंग, भाषा, धर्म यांचा विचार न करता जगातील प्रत्येक बालकाला सर्वांगिण विकासाचा हक्क असून त्याला सूखी व समृध्द जीवन उपलब्ध व्हावे या हेतूने संयूक्त राष्ट्रसंघाने २० नोव्हेंबर १९५९ ह्या दिवशी बालकांचे जन्मजात हक्क घोषित करणारा जाहिरनामा प्रस्तूत केला आणि तेव्हापासून २० नोव्हेंबर हा दिवस जागतिक बालहक्क दिन म्हणून साजरा केला जातो. प्रत्येक जन्मजात बालकास जन्मसिध्द अधिकार व हक्क प्राप्त करून देणारे कायदे प्रगत राष्ट्रांनी वेळोवेळी केल्याचे दिसून येते.

भारतासमोर बालकामगार हा नेहमीच आव्हानात्मक प्रश्न राहीला आहे. प्रश्न सोडविण्याकरिता सरकारकडून नेहमी प्रयत्न करण्यात येतात. परंतू त्याचे पूर्णपणे निराकरण झाले नाही. कारण हा प्रश्न सरकार आणि समाज दोघांचाही आहे. आज गरीबी आणि अशिक्षितता यामूळे वाढत आहे. भारतासाठी प्रत्येक भागातून योग्य ती पाऊले उचलून हा प्रश्न सोडविणे गरजेचे आहे. चाइल्ड राइटस अँड यू तर्फे बालमजूराची सद्यस्थिती उघड करणारा अहवाल प्रकाशित केला त्यानूसार २०११ च्या जनगणने नूसार १८ वर्षा पेक्षा कमी वयाची ६२.५टक्के मूले शेती आणि इतर उद्योगात कार्यरत आहेत, तर १० पैकी सात मूले शेतात राबतात. भारतातील ६० टक्के किंबहूना त्यापेक्षा अधिक मूले शेती आणि शेतीशी संबंधित उद्योगात राबत असल्याचेही समोर आले. देशातील काही राज्यामध्ये बालमजूरांचे प्रमाण राष्ट्रिय सरासरी पेक्षा हि अधिक असल्याचे आढळून आले. हिमाचल मध्ये ८६.३३ टक्के सर्वाधिक आहे.छत्तिसगड, नागालँड मध्ये हे प्रमाण अनूक्रमे ८५.०९ आणि ८०.१४ टक्के आहे. मोठ्या राज्याचा विचार करता मध्य प्रदेशामध्ये हे प्रमाण ७८.६६ टक्के आहे. त्यापाठोपाठ राजस्थान ७४.६९ टक्के, विहार ७२.३५ टक्के, ओडिसा ६९ टक्के, आणि आसाम ६२.४२ टक्के असे आहे. बालमजूरी हि समाजासमोरील मोठी समस्या आहे. आज आपल्याला अनेक ठिकाणी बालकामगार आढळतात. भाजीपाल्याची विक्री, चहाची टपरी, छोटी हॅटेल्स कारखाने, खाणी, कॅंटरिंग व्यवसाय, दूकाने, वसस्थानक, रेल्वेस्टेशन तसेच रस्त्यावर कोणत्यातरी साहित्याची विक्री करतांना, शेतात व इतर ठिकाणी बालकामगार आढळण्याचे प्रमाण अधिक आहे. ज्या वयात या मूलाच्या हातात पूस्तके असायला हवीत, त्या वयात मूलांना मजूरी करावी लागते.ही बाब निश्चितच भूषणावह नाही.

जागतिक पातळीवर विचार केल्यास भारतात बालकामगारांची संख्या खूप जास्त आहे. आतरराष्ट्रीय श्रम संगठन नूसार जगभरातील २१ कोटीपेक्षा जास्त मूलांकडून बालमजूरी करून घेतल्या जाते. संपूर्ण जगातून ७१ पेक्षा जास्त देशात बालमजूरी होते. विकसनशील देशात बालमजूरीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. देश जेवढा मोठा व गरिब तेवढ्या त्यात अधिक समस्या असतात भारताच्या दृष्टिने विचार केल्यास भारत लोकसंख्येच्या बाबतीत दूस-या क्रमांकावर आहे.भारतार श्रमशक्तीच्या ३.६ टक्के भाग हा १४ वर्षाखालील बालकामगारांचा आहे.ऑपरेशन रिसर्च ग्रुपनुसार १९८३ मध्ये भारतात ४ केटी४० लाख बालकामगार होते.नॅशनल सॅंपल सर्व्हेनूसार १९९३ मध्ये देशात १ कोटी ७० लाख बालकामगार होते. एनएसएसओ च्या सर्व्हेनूसार २००९-१० मध्ये जवळपास ५० लाख बालमजूर भारत देशात होते. त्यात मुलींची आकडेवारी १९ लाख ,तर मुलांची संख्या ३० लाखावर होती. यात जवळजवळ अडीचलाख बालमजूर महाराष्ट्रात आढळून आले होते. राज्यातील १५ जिल्हयामध्ये बालकामगारांच्या पुनर्वसनासाठी राष्ट्रीय कामगार योजना राबविण्यात

आलेली आहे. सर्वात जास्त बालकामगार बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्रात आहेत. देशात ८० टक्के बालकामगार हे ग्रामीण भागात आहेत. आपल्या देशात प्रत्येक ११वा बालक स्वताचा खर्च स्वता उचलतो, म्हणजेच बालमजूरी करतो. अनूसूचीत जाती जनजाती, आदिवासी समूदाय, मुस्लिम व ओबीसी वर्गात बालकामगारांची संख्या फार चिंताजनक आहे. क्राय संस्थेप्रमाणे मागील १० वर्षात फक्त २.२ टक्क्यांनी बालमजूरीत घट झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार देशात ८.४ कोटी मूले शाळेत जात नाहीत. शाळेत न जाणा-या मुलांपैकी फक्त १९ टक्के मुले बालमजूरी करतात. बालमजूरी प्रतिबंध कायदा १९८६ नुसार १४ वर्षाखालील मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करणे हे या अधिनियमाचा मुख्य उद्देश आहे. मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास धोकादायक मानल्या गेलेले १६ व्यवसाय व हानिकारक ६५ प्रक्रियांमध्ये मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. सोबतच ज्या आस्थापनांमध्ये मूलांना कामावर ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे., अशा सर्व कारखान्यावरही हा अधिनियम नियंत्रण ठेवतो. दंडात्मक शिक्षा देण्याचीही तरतूद आहे. पण कुटूंब व प्रशिक्षण संस्थांना या अधिनियमातून वगळण्यात आले आहे. कायदे ,अधिनियम किती ही केले तरी जो पर्यत समाजाची मानसिकता बदलत नाही, तो पर्यत त्याचा काही परिणाम नाही. लहान मूलांचे शोषण करणे सोपे असते म्हणून त्यांना कामावर ठेवण्यात येते. लहान मूले त्यांच्या वयाला अयोग्य अशा ठिकाणी व अशा प्रकारची कामे का करत असतात, याची अनेक कारणे आहेत.

**बालमजूरी मागील कारणे –**

- ग्रामीण व कौटौंबिक दारिद्र, अत्यल्प उत्पन्न
- अनाथ परिवातील सदस्यांची बेरोजगारी
- कामाच्या निमित्ताने पालकांचे होणारे स्थित्यंतर
- परंपरा, रूढी, चालीरिती, पालकांमध्ये शिक्षणाचा अभाव
- मूलांवर नियंत्रणाचा अभाव, दूर्लक्ष
- अक्षम शासकिय योजना व त्याचे नियोजन
- मूलांच्या प्रश्नाकडे बघण्याची शासनाची उदासीन वृत्ती, कायद्याचे पालन करण्याचा अभाव
- घरातील वादविवादाला कंटाळून अनेक मूल घर सोडून पळून जातात व बाहेर काम करू लागतात.
- शिक्षणाकडे लक्ष नसल्याने कामाकडे वळणे, लवकर पैसे कमविण्याची ओढ लागणे
- लोकसंख्येचा भडका, स्वस्त मजूर
- गरिबी

या आणि अशा स्वरूपाचे अनेक कारणे आपल्याला बालमजूरीची दिसून येत असली तरी बालमजूर असणे, किंवा कमी वयात त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त काम करून घेणे हे निश्चितच योग्य नाही. त्याकरीता अशा वाढत जाणा-या ह्या समस्येला पायबंद घालणे हे आवश्यक आहे. त्याकरिता खालील उपाय योजना करणे आवश्यक झाले आहे.

उपाय –

- बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे.
- सर्वशिक्षा अभियानासारख्या योजना राबविणे.
- कौटूबिंक पातळीवर पालकांची जागृती करून, मूलांच्या समस्याची जाणिव करून देणे.
- शासकीय योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे.
- बालकाश्रमची स्थापना करणे
- बालमजूरांसाठी केलेल्या कायदयाची अंमलबजावणी कडक होणे गरजेचे आहे.
- मूलांच्या आरोग्यावर परिणाम होईल अशा जागी काम करण्यास बंदी करावी.

विकसनशिल व अविकसित देशांमध्ये बालकामगारांची संख्या विकसित राष्ट्रापेक्षा अधिक आहे. आर्थिक दृष्ट्या कमकूवत देशात बालकामगारांना सहानुभूती मिळते, कारण कौटुंबिक परिस्थिती हालाखीची असणे होय. विकसनशिल देशात विकसित देशांपेक्षा लोकसंख्या अधिक असल्यामुळे शासकीय योजना तळागाळापर्यत पोहचत नाहीत.पोहचल्या तर त्याची फलश्रृती पाहीजे त्या प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे शासकीय ध्येयधोरणे कीतीही योग्य असली तरी त्याची उपयोगीता अधिक प्रमाणात दिसून येत नाही.कुटूंब संख्या अधिक असल्यामुळे उत्पन्न मिळणारे हात अधिक असणे गरजेचे असते,त्यामूळे घरातील सर्वानीच उत्पन्नात सहकार्य करणे आवश्यक असते,त्यातुनच बालकामगाराची निर्मिती होण्यास मदत होते. बेताची आर्थिक परिस्थिती असल्यामूळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. शिक्षणाचे महत्व कमी होतो असे असले तरी आर्थिक दृष्टया कमकूवत असलेल्या कुटूंबातील मुले बालमजूर नाहीत हेही सत्य आहे. कारण ज्या कुटूंबाला शिक्षणाचे महत्व पटले आहे त्याची मूले शाळेत जातात. गरीब कुटूंबात व्यसधिनता हाही महत्वाचा मुद्दा असतो, त्यमुळे घरातील प्रश्न अधिकच बिकट होतात व त्यातुनच बालकामगार जन्म घेतात. त्यामुळे समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देण्याबरोबरच सर्व बालकांना शिक्षण घेता येईल अशी व्यवस्था करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. याच बरोबर समाजाची मानसिकता हदलने सुध्दा तितकेच गरजेचे आहे. तसेच वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण प्रस्तापीत करणे आवश्यक आहे.